



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड








www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. १८ ऑक्टोबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : २१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२


# बाई ऽऽऽ! काय हा प्रकार? झापुक झूपूक गावला मोका!

## ‘बिग बॉस’चा गुलीगत धोका!

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्राचा ‘बिग बॉस’ कोण याचा निर्णय ‘ग्रँड फिनालेत’ म्हणजेच २३ नोव्हेंबरला होईल. ‘बिग बॉस २०२४’ चा हा सिझन अंतिम टप्प्यात आला आहे. महाविकास आघाडीचे तीन पक्ष आणि महायुतीचे तीन पक्ष हे टॉप सिक्स फाईनलीस्ट आहेत खरे पण शरद पवार (तुतारी) आणि देवेंद्र फडणवीस (कमळ) या दोघांनी आपआपल्या गटातल्या इतर दोघांना धोका देत निष्प्रभ करुन टाकल्याने आता या दोघांपैकी एक ठरणार आहे 'बिग बॉस २०२४'चा मानकरी ! महाराष्ट्रात पहिल्यांदाच ‘बिग बॉस’ची लढत रंगतदार ठरत आहे. या पूर्वीच्या ‘सिझन्स’मध्ये अशी मजा नव्हती. यंदा सहा पक्षांनी मिळून दोन गट बनवले; आधीच्या दोन पक्षांच्या गटाचे सहा गट करण्यातही ‘बिग बॉस २०२४’ च्या या दोघां फायनलीस्टचाच वाटा होता. आता तीन-तीन पक्षांच्या दोन गटात लढत होईल, असे वाटत असतानाच या दोन्ही गटातील प्रभावशाली दोन नेत्यांनी आपल्या सहकाऱ्यांना धोका देत वर्चस्व निर्माण केल्यानं दोनही गटातील पक्षांची आपआपसात लढाई सुरु झाली आहे.**




विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपाचं घोडं पूर्णत्वाच्या दिशेनं महाविकास आघाडी अन् महायुतीकडून दामटवलं जातंय. महाविकास आघाडीचा विचार करता जागा वाटपात शरद पवारांचा तर महायुतीमध्ये देवेंद्र फडणवीसाचं वरचष्मा दिसतोय. जागा वाटप हे पवार अन् फडणवीस या दोघा धुरंधर नेत्यांनी आपल्या कब्जाखाली आणलंय. वास्तविक महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी शरदचंद्र पवार, काँग्रेस आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे तर महायुतीमध्ये भाजप, अजित पवार राष्ट्रवादी गट व एकनाथ शिंदे शिवसेना असे सहा पक्ष आहेत. मात्र, जागा वाटपात शरद पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी हुकमत आणल्यानं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार आणि भाजप हे दोन पक्ष ‘वजनदार’ ठरताना उर्वरीत चार पक्षांना या दोघा पट्टीच्या नेत्यांच्या डावापुढे निष्प्रभ ठरणं जणू क्रमप्राप्त होईल, हे वास्तव सध्या तरी दिसत आहे. जागा वाटपात माहिर ठरणाऱ्या देवेंद्र फडणवीस आणि शरद पवार यांच्या जागा वाटपाच्या धोरणाचा सोलापूर जिल्ह्याला मोठा फटका बसेल असे दिसते.

विशेषत्वे, जागा ताब्यात घेण्याच्या पवार अन् फडणवीसांच्या अप्पलपोटी धोरणाचे सोलापूर जिल्ह्यातील विधानसभेच्या निवडणुकीत परिणाम उमटणार आहेत. महाविकास आघाडीचा विचार करता, घटक पक्ष राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षासाठी जागा वाटपाचे शिल्पकार शरद पवार यांनी सोलापूर जिल्ह्यात माळशिरस, माढा, मोहोळ, करमाळा, दक्षिण सोलापूर, बार्शी आणि पंढरपूर या मतदार संघांवर दावा केल्यानं महाविकास आघाडीमधील मित्र पक्ष असलेल्या उद्धव ठाकरे शिवसेना गट आणि काँग्रेसला शरद पवारांनी जागांची अडचण करुन ठेवली आहे.

### दक्षिण अन् बार्शीच्या आग्रहामुळे फटका

वास्तविकपणे महाविकास आघाडीच्या जागा वाटपात सोलापूर शहर दक्षिणची जागा ही काँग्रेसच्या वाट्याची आहे. या पक्षाचा इथल्या जागेवर प्रबळ दावा आहे. मात्र शरद पवारांनी धर्मराज काडादींना निवडणुकीसाठी उठवून बसवत काँग्रेसच्या जागेवर अतिक्रमणाचाच प्रयत्न ठेवल्याचे दिसते. असाच त्यांचा फॉर्म्यूला बार्शी मतदार संघासाठी दिसतो. महाविकास आघाडीच्या जागा वाटपात इथली जागा शिवसेनेकडे असताना शरद पवारांनी ही जागा स्वत:कडे खेचण्याचा बेत ठेवल्याची माहिती समोर येत आहे. तिथं शिवसेनेचं नुकसान होत आहे. उत्तरच्या जागेवर ही शरद पवार गटानं हुकमत आणण्याचा घाट घातल्यानं तिथंही काँग्रेसच्या हातात घंटा येऊ शकते.

### पंढरपूरच्या जागेवरुन काँग्रेसवर गडांतर

खरं तर पंढरपूर-मंगळवेढ्याची जागा ही महाविकास आघाडीच्या जागा वाटपात काँग्रेसकडे आहे. तथापि, असं असताना शरद पवार यांनी आपला कटाक्ष पंढरपूर-मंगळवेढ्यावर टाकला आहे. जागा वाटपात पवारांनी ही जागा स्वत:च्या पक्षाकडं घेतल्यास त्या ठिकाणी काँग्रेसला फटका बसणार हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज नाही.

### बार्शी अन् करमाळ्याला फडणवीसांची हुकुमत

बहुचर्चित बार्शी अन् करमाळा या दोन्ही मतदार संघांना अपक्ष अशी झालर लागलेली. इथं अपक्ष उमेदवारांनी बाजी मारलेली. महायुतीच्या जागा वाटपातही इथल्या जागा या शिवसेनेच्या वाट्याच्या. तरीपण या दोन्ही जागा भाजपकडं खेचून देवेंद्र फडणवीसांनी आपली पर्यायानं भाजपची हुकमत दाखविली आहे.

### सोलापूर जिल्ह्यात अजित पवारांचं काय?

महायुतीत राहून काका शरद पवारांसोबत शह-कटशाहचं राजकारण करणाऱ्या अजित पवारांचं विधानसभेला सोलापूर जिल्ह्यात बलस्थान काय ? असा वस्तुनिष्ठ प्रश्न आहे. कारण केवळ मोहोळ मतदार संघात त्यांच्या गटाचा आमदार यशवंत माने यांच्या रुपानं उमेदवार आहे. उर्वरीत दहा जागेच्या ठिकाणी ते शुन्य आहेत. भाजपसोबत राहताना सोलापूर जिल्ह्याच्या दृष्टीनं उमेदवारीत अजित पवारांच्या दृष्टीने काय पडलं? हा सरळसाधा प्रश्न आहे.

---

# सरांच्या मनातले कमळ कोमेजले, तुतारीची भूरळ!



✔ सोलापूर/प्रतिनिधी

**पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादीचे नेते तथा भाजप ग्रामीण विभागाचे प्रदेश प्रवक्ते माजीमंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे हे भाजपला सोडचिठ्ठी देण्याच्या तयारीत असल्याची माहिती त्यांच्या अत्यंत निकटवर्तीयांकडून देण्यात आली. सुपुत्र अभिजित ढोबळे अन् कन्या कोमल साळुंके यांच्या विधानसभा लढण्यातून त्यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याचा अट्टाहास असल्याचे सांगण्यात येतं.**

विशेषत्वे, शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याच्या अनुषंगाने, ढोबळे यांनी खासदार सुप्रिया सुळे यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यासंबंधीचे व्हिडीओ सोशल मीडियाच्या साइटस्‌सह प्रसारमाध्यमांवर गुरुवारी (ता.१७) झळकले. आरक्षीत मोहोळ मतदार संघातून सुपुत्र अभिजित किंवा कन्या कोमल साळुंके यांना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून उमेदवारी मिळावी, यासाठी प्रा.लक्ष्मण ढोबळे हे प्रयत्नशील आहे. अभिजित ढोबळे आणि कोमल साळुंके यांनी मोहोळ विधानसभेसाठी उमेदवारी मागितली आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या इच्छुकांच्या मुलाखतींमध्येही ढोबळे बहिण-भाऊ दिसले होते.

### दशकभरापासून भाजपने डावल्याचा आरोप

माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांनी विविध प्रकारे राज्यभरात भाजपचा विस्तार करण्यासाठी प्रामाणिकपणे आणि सचोटीने प्रयत्न केले. बहुजन रयत परिषदेच्या माध्यमातून राज्यात समाजामध्ये भाजपची ध्येय धोरणे रुजविण्यासाठी कष्ट उपसले. मात्र, दहा वर्षांपासून प्रा.ढोबळे यांना भाजपकडून प्रत्येक वेळी, प्रत्येक आघाडीवर डावलेले जात असल्याचा आरोप बहुजन रयत परिषदेने केला आहे.

---

✔ माळीनगर/प्रतिनिधी

**माळशिरस विधानसभा मतदारसंघात सत्तेच्या सारीपाटाच्या चर्चांना उधाण आले आहे. आपल्या समोर कोणते सैन्य आहे. कुणाशी आपली आरपारची लढाई आहे हे सर्वांना माहिती आहे. परंतु, दोन्ही मातब्बर सैन्याचे सेनापती मात्र आपली भूमिका गुलदस्त्यात ठेवताना दिसत आहेत. माळशिरस विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी आरक्षित आहे. स्थानिक उमेदवार मिळावा यासाठी बऱ्याच प्रमाणात अनेकांची मागणी आहे. माळशिरस विधानसभा मतदार संघात शरद पवार आणि अकलूजकर मोहिते-पाटील विरुद्ध देवेंद्र फडणवीस अशी खऱ्या अर्थाने लढत होईल, मात्र उमेदवारीचे चेहरे फिक्स होणे बाकी आहे.**

# सामना पवार, मोहिते-पाटील विरुद्ध फडणवीस असाच



यासगळ्यांत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि भारतीय जनता पक्षाचे आमने-सामने आव्हान दिले जाणार यात शंका नाही. आघाडी आणि युती या दोन्हीसाठी ही जागा मानाचीच आहे. असे असले तरीही या दोन्ही बाजूंनी त्यांचा उमेदवार अधिकृतपणे घोषित न केल्याने संभ्रम कायम आहे.

सध्या माळशिरस विधानसभा मतदारसंघामध्ये माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील,खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, उत्तम जानकर आणि आघाडीतील नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार राम सातपुते,आणि युतीतील मित्र पक्षातील नेते यांच्याकडून कोणती रणनीती आखली जाते याकडे लक्ष लागून राहिले आहे.

मागची लोकसभा निवडणुकीने संयमी कसे रहावे, मैत्री कशी जोपासावी, बेरजेचे गणित कसे जुळवावे,सत्तेची घमेंड कशी उतरावी, बंडखोर भासणारा नेता प्रत्यक्षात नायक होऊन दाखवतो. हे शिकवले असे धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या बद्दल बोलले जात आहे. तरअनेक वर्षांपासूनचा विरोध संपवून मोहिते पाटील यांच्याशी मनोमीलन केलेल्या उत्तम जानकरांच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडणार असे बोलले जात आहे. तर भाजपाकडून देखील अनेक इच्छुक उमेदवार पुढे येताना दिसून येत आहे. पण काहींना पुन्हा रामभाऊ सातपुतेच हवे आहेत.

### माळशिरस

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी मधून भाजप या पक्षात मोहिते-पाटलांनी प्रवेश केला आणि माळशिरस तालुक्याला व माढा लोकसभेला पहिल्यांदाच भाजपचा आमदार व खासदार मिळाला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात मोहिते-पाटील परिवाराने प्रवेश केला आणि माढा मतदारसंघात तुतारी वाजली. या दरम्यान मोहिते-पाटलांचे पारंपारिक विरोधक उत्तमराव जानकर यांनी मोहिते-पाटील यांच्याशी हात मिळवणी केली आणि माळशिरस विधानसभेच्या निवडणुकीचे गणितच बदलून टाकले.

यंदाच्या निवडणुकीत उत्तमराव जानकर हेच आमदार होतील असे मोहिते-पाटील परिवाराकडून ठासून सांगितले जातेय तर विद्यमान आमदार राम सातपुते हे मात्र माळशिरस मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी फार इच्छुक असावेत अशी शक्यता नाही. त्यामुळे राम सातपुते आणि उत्तम जानकर यांच्यात लढत होणार की भाजपकडून अन्य चेहरा पुढे केला जातोय हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. त्यामुळे सत्तेच्या या महासंग्रामात पुढचे फासे कसे पडतात? कोण चक्रव्यूहात सापडणार? कोण भेदणार? हे येणारा काळच ठरवेल.